आपला महाराष्ट्र

# सौगात ए भारत असू द्या!

आपल्या देशात परक्यांची अनेक आक्रमणे झाली. बाबर ते बहादूर शाह जफर अशी मुघलांची सत्ता देशात होती. निजाम शाही होती तशी कुतुबशाही होती. पोर्तुगीज आले आणि त्यांनी गोवा ताब्यात घेतला. दिव दमन त्यांच्याच तव्यात होते. फ्रेंच आले, पर्शियन आले, ब्रिटिश आले. त्यांनी दीडशे वर्षे राज्य केले. या परकीय सत्तांना कोणी वेलकम केले, कोणी त्यांना सहकार्य केले, कोण बुद्धीवान होते. कोणी त्यांच्या पदरी चाकरी केली. कोण त्यांना शरण गेले. कोणी त्यांचे फायदे घेतले. कोणी त्यांच्या सैन्यात बहुजनांना भरती केले आणि दीर्घ काळ या राजवटींना सुखेनैव राज्यकारभार करण्यास अवकाश प्राप्त करून दिला. या सर्व चर्चांना आज काही अर्थ नाही. सारा बहुजन समाज, सारे मागासवर्गीय, सारे आदिवासी आणि भटके हे निरक्षर ,शोषित होते. एक दोन वर्षे नव्हे तर हजारो वर्षे होते. त्या सर्वांना संबंधित राजवटींनी वापरून घेतले आणि त्यांनी तसे बहुजनांना वापरावे अशी व्यवस्था अभिजनांनी करून दिली. ते सर्व दृष्टिंनी संपन्न झाले.नंतर लोकशाही आली. बहुजन संघटीत झाल्यानेच ती आली. त्या व्यवस्थेने बहुजन व अल्पजनांना भान आले. त्यांना जगण्याचा अर्थ कळू लागला तेव्हा कुठे अभिजनांनी आता अलीकडे पूर्व राजवटीतील सत्ताधीशांचे वाभाडे काढायला सुरुवात केली. त्यात सर्वसामान्यांना गुंतवून ठेवण्याचा प्रयतक सुरू केला. त्यातल्या त्यात एक अफूची गोळी गेल्या दहा वर्षातील राजवटीत लोकांना दिली गेली. त्यात ते झिंगत असतानाच. धार्मिक विद्वेष आणि वर्ग विग्रह या दोन पातळ्यांवर देशाला आणून ठेवण्याचे प्रयतक मोठ्या प्रमाणावर होत आहेत. महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवरून जे रणकंदन सभागृहात, सभागृह बाहेर माजले आणि त्याची परिणती ही नागपुरातील दंगलीत झाली. हे सर्व धार्मिक विद्वेषाच्या कट्टर भावनेतून निर्माण करण्यात आले. संविधानाची शपथ घेऊन कारभार करणारे मंत्री सुद्धा कबरीबाबत बोलत होते. विशेष म्हणजे रमजान महिना आणि रोजे चालू असताना जाणीवपूर्वक अशा प्रकारचे जहरी वातावरण राज्यात निर्माण करण्यात आले.

मात्र त्याचवेळी सौगात ये मोदी अशी घोषणा राजधानीतून झाली. जो कार्यक्रम या सौगातीतून शासक पक्ष राबविणार आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. फक्त एवढीच सूचना आहे की सौगात-ए-मोदी च्या ऐवजी सौगात -ए-भारत औकिंवा सौगात ए हिंद अशी संकल्पना राबविल्यास शासक पक्षाची प्रतिमा थेट सेक्युलॅरिझम मध्ये मोडली जाईल. आणि ते चांगले लक्षण म्हणावे लागेल. काही राज्यातील आगामी निवडणुका लक्षात घेता अशी घोषणा शासक पक्षाने केली हे उघड आहे. असे असले तरीही त्या पक्षाचे कार्यकर्ते ३२ लाख अल्पसंख्याकांना रमजान निमित्त मशिदीत किंवा त्या त्या मोहल्यात जाऊन भेटतील, त्यांना खजूर, आणि तत्सम खाद्यपदार्थ देतील. आणि आमच्या नेत्यांनी तुमच्यासाठी ही भेट पाठवली आहे असे सांगतील. लोकशाहीत व्यक्तीला स्थान नसते. लोकशाही प्रक्रियेतून व्यक्ती निवडली जाते. विवक्षित काळासाठी तो कारभार बघतो. पुन्हा तो येतोच असे काही नाही. म्हणून ही प्रक्रिया व्यक्ती सापेक्ष असते त्यामुळेच सौगात द्यायचीच असेल तर ती हिंद च्या नावाने द्या. असे आम्हाला वाटते. त्यामुळे फार मोठी कामगिरी शासक पक्षाकडून होईल आणि त्याचा त्यांना फायदाच होईल.

आपल्या देशात छत्रपती शिवाजी महाराजांसारखे दूरदृष्टीचे रयतेचे राजे होऊन गेले. साडेतीनशे वर्षांपूर्वी आज अस्तित्वात असलेली सर्वधर्मसमभावाची संकल्पना महाराजांनी राबविली होती हा फार महत्त्वाचा मुद्दा म्हणावा लागेल. जाणीवपूर्वक काही त्यांनी तशी मोहीम राबविली नाही परंतु रयतेचाच एक भाग म्हणून अल्पसंख्यकांना त्यांनी मानाचे स्थान दिले. मदत केली. आणि क्रूर शासकांना योग्य ते शासन केले. नंतरच्या काळात गांधीजींनी सर्वधर्मसमभावाच्या संकल्पनेची पुनर्मांडणी केली. त्यांनी आश्रमात जात आणि धर्म यातील भिंती तोडून टाकल्या. परिणामी जात धर्म पंथ विसरून लोक त्यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याच्या लढ्यात मोठ्या प्रमाणावर उतरले. सर्व धर्मांची प्रार्थना त्यांनी मैदानात आणली. हिंदू, शीख, ईसाई, जैन, बौद्ध, पारशी, अशा सर्वच धर्माच्या प्रार्थनांचा त्यात समावेश आहे. महात्मा जोतिबा फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांनी फार मोठ्या प्रमाणावर सर्व धर्म सम भावाचे आणि विषमता नष्ट करण्याचे मोठे कार्य केले. महाराष्ट्रातील जी संत परंपरा आहे किंवा वारकरी संप्रदाय आहे त्यातील सर्वच जातीच्या संतांनी हा विचार प्रकर्षाने मांडलेला आहे. आजही वारकरी संप्रदाय जाती-धर्माच्या पलीकडे आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यात यशस्वी झालेला आहे. मात्र त्यातही आता धर्मांध संघटनांनी किंवा धर्माधिष्ठित व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी गेली दहा दशके प्रयतक करणाऱ्या गटांनी वारकरी संप्रदायाला विशिष्ट कोंदणात आणून ठेवण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्यामुळे वारकरी संप्रदायातील एका गटाचे अभिजन वर्गातील नेते तशी भाषा बोलू लागले आहेत. याचा अर्थ या संप्रदायाचा नायनाट करण्याचा देखील चंग या मंडळींनी बांधलेला दिसतो. परंतु जोवर सर्वसामान्य माणसाच्या मनात कुठल्याही जात आणि धर्माबाबत वितुष्ट निर्माण होत नाही तोपर्यंत संविधानात असलेल्या तरतुदीच्या नुसार धर्मनिरपेक्षेला कोणीही हात घालू शकणार नाही. मुळात या देशावर कोण राज्य करीत होते आणि कुणाच्या राजवटी होत्या. हे दळण दळण्यात आता काही अर्थ नाही. कारण त्यास एक नाही ना दोन नाही शेकडो वर्षे झाली आहेत. पण नेमके ज्यांनी परकियांना मदत केली तेच लोक आता गळे काढत आहेत हे विशेष म्हणावे लागेल. त्या पार्श्वभूमीवर सौगात ए हिंद आम्ही महत्त्वाची मानतो. हे वातावरण देशात जाणीवपूर्वक निर्माण करण्याची गरज आहे. तसे असेल आणि सर्व धर्मांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका असेल. दुय्यम दर्जा देण्याची भूमिका नसेल तर कितीही वर्षे त्यांनी राज्य केले तरी काही बिघडत नाही. कोण राज्य करतो हे महत्त्वाचे नसून राज्य कसे करतो आणि त्यांची धोरणे कशी आहेत. यावर सारे काही अवलंबून आहे. शेवटी भारताचे संविधान महत्त्वाचे आहे आणि त्याचा आदर कुठल्याही परिस्थितीत राखलाच गेला पाहिजे. त्यावर हुकूम अंमलबजावणी देखील झाली पाहिजे. असा आमचा आग्रह आहे.

शासक पक्षाची सौगात वाटपाची भूमिका राजकीय स्वरूपाची असली, दोन राज्यातील अल्पसंख्याकांची टक्केवारी बऱ्यापैकी असल्यामुळे ती मते आपल्याला मिळावी किंवा आपल्या पक्षाला मिळावीत यासाठी हा खटाटोप आहेच. पण त्याचा वापर करून जर मते मिळाली. आणि नंतर भूमिका बदलली किंवा मूळ भूमिकेवर शासक पक्ष आला तर मात्र परतीचे दोर कापलेले असतील. ही मोहीम सुरू होताच महाराष्ट्रात तरी जे उच्छृंखल आहेत, ज्यांना सतत विद्वेषच हवा आहे. तसे केले तरच आपले राजकारण टिकू शकते असे ज्यांना वाटते, धर्मा धर्मात तेढ निर्माण करून आपली पोळी भाजता येते असे ज्यांना ज्यांना वाटते आणि त्यामुळे त्यांना चेव येतो अशा लोकांना आता यापुढे लगाम लागेल किंवा त्यांच्या तोंडाला पट्टी लावली जाईल. कबरीची भाषा बंद करावी लागेल. सर्वधर्मसमभाव कसा छत्रपतींनी आपल्या देशात साडेतीनशे वर्षांपूर्वी आणला होता, तो किती योग्य होता, तेवढी दूरदृष्टी राजांना होती असे बोलावे लागेल. त्यामुळे आतापर्यंत विद्वेषाची जी पेरणी या लोकांनी केली त्यातून फक्त खुरटे गवत उगवेल. काटेरी झाडे निर्माण होणार नाहीत, त्यांना विषारी फळेही लागणार नाहीत. ही कामगिरी तमाम पुरोगाम्यांना किंवा परिवर्तनवादी विचारसरणीच्या लोकांनी करावयाची ती शासक पक्षच हाती घेणार असल्यामुळे त्यांचे काम सोपे होणार आहे. फक्त एवढेच की जी जबाबदारी एकदा हातात घेतली ती अखेरपर्यंत शेवटास नेली पाहिजे एवढी अपेक्षा करण्यास हरकत नसावी.

# स्व.डॉ.आण्णासाहेब भाईदास पाटील यांच्या जयंती निमित्त सुसज्य ट्रॉमा केअर सेंटरचे लोकार्पण संपन्न

**धुळे, दि.२८- जवाहर मेडिकल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष स्व.आण्णासाहेब भाईदास चुडामन पाटील यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधुन संस्थेच्या ए.सी.पी.एम वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रसामग्रीने सुसज्य वातानुकलीत अशा ट्रॉमा केअर सेंटरचा लाकार्पण सोहळा संस्थेच्या सचिव डॉ.ममताताई पाटील यांचे हस्ते करण्यात आला.**




यावेळी डॉ.शैलेंद्र पाटील, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नितीन कुलकर्णी, सौ.संगीता पाटील, ट्रॉमा केअर सेंटरची संकल्पना मनात ठेवून ह्या विभागाचे विभागप्रमुख म्हणून जबाबदारी स्विकारलेले प्रसिध्द अस्थिरोगतज्ञ डॉ. योगेश झाडबुके, डॉ.आर.व्ही. पाटील, डॉ.मधुकर पवार, डॉ.नंदकुमार द्रविड, डॉ.सुरेंद्र वडगांवकर, डॉ. शोधन गोंदकर, डॉ.गिंदोडीया, डॉ.धोतकर, डॉ.कोल्हे, डॉ. कुवंर, डॉ.पानट, डॉ.मंजुलाबाई, डॉ.रोहण कुलकर्णी तसेच सर्व विभागप्रमुख, टॉमा केअर सेंटरचे सर्व डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ व कर्मचारी उपस्थित होते. लोकार्पण सोहळयानंतर जागतिक क्षयरोग दिनानिमीत्त आयोजित केलेली रांगोळी व पोस्टर प्रदर्शनाचे देखील यावेळी सचिव डॉ.ममताताई पाटील यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. क्षयरोगाची लागण असलेले व आर्थिक परिस्थिती नसलेले रुग्णांना आजच्या दिनाचे औचित्य साधुन दर महिण्याला निश्चय मित्र योजने अंतर्गत पोषक आहाराचा शिधा वाटप या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. आज प्रासंगीक २० रुग्णांना मोफत पोषक शिधा वाटप करण्यात आला.

कार्यक्रमाचे मनोगत व्यक्त करतांना संस्थेच्या सचिव डॉ.ममताताई पाटील यांनी सांगीतले की, स्व.डॉ. आण्णासाहेब भाईदास पाटील यांनी शिकविलेल्या वाटेवर वाटचाल करतांना नक्कीच अशा समाजोपयोगी योजनांचे लोकार्पण माझ्या हातुन करतांना नक्कीच अभिमान वाटतो. समाजातील तळागाळातील रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी स्व.आण्णासाहेब यांनी त्यांचे उभे आयुष्य खर्ची घातले व त्यांचे स्वप्न पुर्ण करणे हेच आमचे उद्दीष्टे असुन आज आम्ही त्यांच्या स्वप्नपुर्तीसाठी एकएक पाऊल उचलत आहोत. त्यांचे स्वप्न साकार करणे हीच त्यांना जयंतीदिन खरी मानवंदना ठरेल.

यावेळी सेंटरचे विभागप्रमुख डॉ.योगेश झाडबुके यांनी देखील स्व.आण्णासाहेब यांच्या कार्याला उजाळा देवून सेंटरमध्ये येणारे प्रत्येक रुग्णाला उपचारात कुठलीच कमतरता भासणार नाही असे आश्वासन देखील केले. जवाहर मेडिकल फाउंन्डेशनमध्ये सर्वच आजारांवर उपचारांसाठी आत्याधुनीक यंत्रसामग्री उपलब्ध असुन येथे अल्पदरात उपचार होतात. याचा लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून जनजागृती व्हावी असे देखील आवाहन अधिष्ठाता डॉ.नितीन कुलकर्णी यांनी यावेळी केले.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक तीन एप्रिलला नंदुरबारमध्ये मतदान

**नंदुरबार, दि.२८ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र वैद्यकीय परिषद २०२५ च्या निवडणुकीसाठी नंदुरबार जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहे. या निवडणुकीसाठी ३ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे.**

निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शिल्पा परब यांनी दिलेल्या माहितीनुसार, या निवडणुकीत एकूण ४१ उमेदवार निवडणूक लढवत असून त्यापैकी ९ सदस्य निवडण्यात येणार आहेत. वैद्यकीय परिषदेकडे १७ जानेवारी, २०२५ पर्यंत नोंदणी केलेल्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायकानी व नोंदणीचे नुतनीकरण केलेल्या व्यवसायकांच्या नावांचा समावेश मतदार यादीत आहे. नंदुरबार जिल्ह्यासाठी निश्चित केलेले ५०६ मतदार आहेत. जिल्हास्तरावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नंदुरबार येथील वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय खोली क्रमांक ४ येथे एक मतदान केंद्र निश्चित करण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा समन्वय अधिकारी, क्षेत्रिय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, वरिष्ठ कर्मचाऱ्यांची मतदान अधिकारी व कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून सर्व अधिकारी-कर्मचारी यांना निवडणूकीबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

निवडणूकीच्या मतदानासाठी, मतदार यादीत ज्यांचे नाव समावेश करण्यात आले आहे असे सर्व वैद्यक व्यवसायी व्यक्तीश: मतदान करतील आणि मतदारांची ओळख पटविण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने दिलेले नोंदणी प्रमाणपत्र, ओखळपत्र किंवा भारतीय निवडणूक आयोगाने लोकसभा/ विधानसभा निवडणूकीच्या मतदानासाठी जी ओळखपत्र ग्राह्य धरण्यास मान्यता दिली आहे, अशी छायाचित्रांसहित ओळखपत्रे, (निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स व इतर), नोंदणी प्रमाणपत्रावर छायाचित्र नसल्यास, छायाचित्र असलेले दुसरे ओळखपत्र दाखवावे लागेल.मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ४ एप्रिल रोजी अवर सचिव तथा निर्वाचन अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, सर ज.जी. रुग्णालय व ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सर जे.जे. मार्ग, नागपाडा भायखळा (पूर्व), मुंबई येथे मतपेटी जमा करण्यात येणार आहे.





# जायंट्स ग्रुपतर्फे विविध भागात पशुपक्ष्यांसाठी जलकुंडाची सोय

**शहादा, दि.२८ (का.प्र.)- जायंट्स ग्रुप ऑफ शहादा आणि सहेली ग्रुप ऑफ शहादाच्या वतीने जागतिक जल दिन निमित्ताने शहादा शहरातील विविध भागात कॉलनींमध्ये उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्राणिमात्रांच्या सुविधेसाठी ठराविक ठिकाणी जलकुंड ठेवण्यात आले आहेत.**

यावर्षी देखील उन्हाळा कडक असल्यामुळे ४० ते ४५ अंशाच्या वर पारा जाण्याची शक्यता आहे. अशावेळी भूतदया म्हणून शहरातील मोकाट गायी,वासरू किंवा इतर प्राणी,पक्षी यांना पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून शहरातील प्राणीमात्रांसाठी जलकुंड ठेवण्याचे कार्य जायंट्स ग्रुप ऑफ शहादा आणि सहेली ग्रुप ऑफ शहादाच्या वतीने करण्यात आले.यावेळी स्वामी नारायण मंदिर परिसर,भाजी मार्केट परिसर,कोटेश्वर महादेव मंदिर,चावडी चौक,डोंगरगाव रोड परिसर अशा ठिकाणी जलकुंड ठेवून जल सेवा देण्यात आली.यावेळी जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष हितेश सोनार,सहेली ग्रुप अध्यक्षा प्रीती सोनार, सचिव अजबसिंग गिरासे, फेडरेशन माजी अध्यक्षा संगीता पाटील ,प्रा.आर टी पाटील, माणक चौधरी,संजय सोनार, संजय छाजेड ,कैलास भावसार ,भूषण बाविस्कर ,सुरेश चव्हाण, मिनेश सराफ,आशा चौधरी,दीपाली बाविस्कर, मनिषा भावसार ,सुषमा सराफ आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## शब्दकोडे क्रमांक : २१२०



आडवे शब्द : १.विजयाचा केलेला जल्लोष ४.एक फळ भाजी ६.शेवट ८.रुची ९.फेटा १०.रविना टंडन, अतुल कुलकर्णी यांचा एक सिनेमा ११.समूह १२.सोबती १३.हिंदीत-जिवंत १५.गुन्हा १७.बिपाशा बासू,दीनो मोरीयो यांचा एक सिनेमा १८.गोंधळ २०.मन २२.दाणेदार २४.जिन्नस २७.कलंक २९.उभट ३१.दिवंगत अभिनेते 'अशोक कुमार' यांचे सिने जगतातील टोपणनाव ३३.लहान टेकडी ३५.जनावराचें कोंवळे (व्याल्या-नंतरचें) दूध तापवून त्यांत गूळ घालून तयार केलेलें खाद्य ३८.वारा ३९.शौर्य ४०.खुळ ४२.तांबडा ४५.दम ४७.दाटीवाटी ५०.शहर ५१.चिंतन ५२.नाकात हुंगायची एक पूड उभे शब्द : १.वारश्यात मिळालेली संपत्ती २.एकाएकी जुळून आलेली घटना ३.घुसळून केलेली डाळ ५.लहान आकाराचे फळ ६.देह ७.हदपार केलेला ९.वापरात नसलेली जागा ११.भीमाचे आयुध १३.इंग्रजीत-आले १४.वाणी १६.बदला; परतफेड; उट्टें; वचपा, अपकाराची प्रतिक्रिया १८.वीट; तिरस्कार; शिंसारी. 'किंबहुना चिळसी १९.हिंदीत-टोमॅटो २१.पोटाचा उद्योग; रोजगार; वृत्ति; चरितार्थाचा व्यवसाय २३.उपयोग २५.हयावेळी २६.हिंदीत-आईची आई २८.किल्ला ३०.रक्षक ३१.सेवक ३२.'ताजमहाल' कोणत्या राणीच्या स्मरणार्थ बांधण्यात आले आहे ३४.हात-हिंदीत ३६.वेळ ३७.अर्ज ४१.विवेक ओबेरॉय, दिया मिर्झा यांचा एक सिनेमा ४३.विवाह ४४.संगत ४५.पावसाची झड ४६.टिकाव ,तग ४८.नामस्मरण ४९.श्रेयस तळपदे, आयेशा टाकीया यांचा एक सिनेमा

शब्दकोडे क्रमांक : २११९चे उत्तर



# प्रबोधन सप्ताहनिमित्त गीत गायन स्पर्धा

धुळे, दि.२८- महात्मा फुले विचार मंच महाराष्ट्र राज्य, कै.ग.द.माळी गुरूजी व्याख्यानम ाला समिती धुळे यांच्यातर्फे दि.१२ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कै.ग.द.माळी गुरूजी यांच्यासंबंधीत तसेच राष्ट्रीय गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा खुली असून नि:शुल्क आहे. सहभागासाठी स्पर्धकाने संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नं., सादर करणार असणारे गीत लेखी स्वरूपात दि. ३१ मार्च पर्यंत राहुल महाजन ५५ सत्संग कॉलनी, विमानतळ रोड, देवपूर धुळे येथे पाठवायचे आहे. विजयी स्पर्धकांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन अण्णा माळी, मिलींद सोनवणे यांनी केले आहे.


# पटेल महाविद्यालयात शिक्षकांनी आत्मसात केले ए.आय.कौशल्ये

शिरपूर, दि.२८- आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (पीएम-उषा) अंतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठाचे संलग्नित शिक्षकांचे तंत्रविज्ञान आणि अध्यापनशास्त्रीय ज्ञान विकसित होण्यासाठी मर्कॅपॅसिटी बिल्डिंग फॉर टीचर्सफ दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेचे उदघाटन प्राचार्य डॉ. दिपक बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झाले.














## पान १ वरुन

### नमो शेतकरी योजनेचे दोन हजार

प्रतिशेतकरी ६ हजार रुपयाच्या लाभामध्ये महाराष्ट्र शासन आणखी ६ हजार रुपयांची भर घालत आहे. त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना एकंदरीत १२ हजार रुपये प्रतिवर्षी लाभ अदा करण्यात येत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते दि.२६ ऑक्टोबर २०२३ रोजी शिर्डी येथून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला आहे. आज अखेर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत एकूण ५ हप्ते वितरीत करण्यात आलेले असून राज्यातील ९०.८६ लाख शेतकरी कुटुंबांना रू. ८९६१.३१ कोटीचा लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात थेट जमा करण्यात आलेला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते माहे डिसेंबर, २०२४ ते माहे मार्च, २०२५ या कालावधीतील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. या हप्ता वित्-ारण सोहळयामध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रू.१९६७.१२ कोटी निधीचा लाभ वितरीत करण्यात आलेला आहे. या व्यतिरीक्त त्यानंतरही केंद्र शासनाने पी.एम. किसान योजनेअंतर्गत एकूण ६५०४७ लाभार्थीना लाभ अदायगीचे नियोजन केले आहे. त्यानुसार राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहाव्या हप्त्याचा सुमारे रक्कम रू.२१६९ कोटी लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार मानत असल्याचं देखील म्हटलं आहे.

### म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप

राजवाडा मंडाले पॅलेसच्या काही भागांचे नुकसान झाले आहे. त्याच वेळी, भूकंपात सागाईंग प्रदेशातील सागाईंग टाउनशिपमधील एक पूल पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. राजधानी नायपिताव व्यतिरिक्त, क्युक्से, पिन ओओ ल्विन आणि श्वेबो येथे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. या शहरांची लोकसंख्या ५० हजारांपेक्षा जास्त आहे.

### मुजोर कारभारावर अंकुश आणा

देखील यानिमित्ताने चर्चिला गेला. सर्वप्रथम जेव्हा कुठलाही बिमाधारक रुग्ण हॉस्पिटल मध्ये दाखल होतो यावेळी बिमा कंपन्या त्याला त्याच्या निर्धारित मार्गदर्शक सूचनेनुसार ऑपरेशन किंवा मेडिकल उपचाराला पूर्व मान्यता देतात. रुग्ण डिस्चार्ज झाल्यानंतर या बिमा कंपन्या बांधील आहेत की त्यांनी किमान ४० दिवसांच्या आत मंजूर झालेली राशी त्या-त्या हॉस्पिटलच्या खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. परंतु बऱ्याच केस मध्ये असे लक्षात येत आहे की, पेशंट घरी गेल्यानतर मंजूर झालेली देयक रक्कम हॉस्पिटलच्या खात्यात जमा न करता बिमा कंपनी कारण नसतांना मंजुरीच्या आचीत्याचे निमित्त पुढे करून तथ्य नसलेले नाही ते प्रश्न पुढे करून नाही ते प्रश्न विचारून हॉस्पिटल आणि डॉक्टर यांना नाहक त्रास देत असतात.

यात धुळे लोकसभा मतदारसंघातील एका हॉस्पिटलमध्ये मागील दोन महिन्यापूर्वी एका रुग्णाचे टोटल हिप-रिप्लेसमेंट हे ऑपरेशन केले. या रिप्लेसमेंटसाठी पूर्व मान्यतेची रक्कम दोन लाख चाळीस हजार रुपये अशी ठरली होती. रुग्णाचे ऑपरेशन झाल्यानंतर तो रुग्ण चांगला होऊन घरी आला. परंतु याच रुग्णाच्या देयकाच्या बाबतीत दोन महिन्यांनी जेव्हा देयकाच्या दाव्याची रक्कम निकाली काढण्याची वेळ आली त्यावेळी अनेक कारणे सांगून, अनेक नोटिफिकेशनचे दाखवून आणि भरपूर कागदपत्रांची वारंवार पडताळणी करून एक लाख सत्तर हजार असे देयक अदा करण्यात आले. यामुळे ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरांचे आणि हॉस्पिटल धारकांचे एकूण सत्तर हजार रुपयांचे नुकसान झाले. डॉक्टरांचे आणि हॉस्पिटल धारकांचे असे दररोज लाखो करोडो रुपयांचे नुकसान या खाजगी बिमा कंपन्या वारंवार करीत आहे.

याच अनुषंगाने धुळे लोकसभेच्या खा.डॉ. शोभा बच्छाव यांनी केंद्रीय संसदीय अधिवेशनात सर्व बिमा कंपन्यांच्या भ्रष्ट मुजोर कारभारावर अंकुश आणावा आणि आरोग्य क्षेत्रासह इतर सर्वच बिमा कंपन्यांचे काम पारदर्शकपणे सुरु राहण्यासाठी उच्च पदस्थ अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर आणि स्थानिक लोक प्रतिनिधी यांचा समावेश असलेली सर्व समावेशक समिती गठित करावी अशी आग्रही मागणी केली. यामुळे देशातील सर्वच नागरिकांनासह डॉक्टरांना, हॉस्पिटलधारकांना आणि देशातील सर्वच रुग्णांना खरा न्याय मिळणार असून रुग्ण सेवेचा उच्चांक गाठला जाण्यास मदत होणार आहे.

### मद्रास उच्च न्यायालयाचा दिलासा

जाण्यासाठी पुरेसा वेळ देण्याची विनंती उच्च न्यायालयाकडे केली होती. न्यायमूर्ती सुंदर मोहन यांच्या खंडपीठाने हा अर्ज मंजूर करताना म्हटले आहे की, कुणाल कामरा यांनी प्राथमिकदृष्ट्या मद्रास उच्च न्यायालयाला खात्री पटवून दिली की तो संरक्षणासाठी महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये जाऊ शकत नाहीत. तसेच न्यायमूर्ती मोहन यांनी असेही निरीक्षण नोंदवले की, या प्रकरणात कोठडीत चौकशी करण्याची आवश्यकता नाही आणि महाराष्ट्रातील मंत्री आणि पक्षाचे कार्यकर्ते धमक्या देत असल्याने कामरा जामीनासाठी येथील न्यायालयांमध्ये जाऊ शकत नाही आणि त्यामुळे महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये अंतरिम अटकपूर्व जामीन नंतर मागितला जाईल.

### उपमुख्यमंत्री शिंदेंची सोमवारी सभा

शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेत आ.रघुवंशी यांनी विरोधकांवर शरसंधान साधले. ते म्हणाले, आदिवासी विकास विभागामार्फत वाटप झालेल्या गाईंचे ऑडिट व्हावे. गाई जिवंत आहेत किंवा नाहीत. जिवंत नसतील तर का जिवंत नाहीत? सद्यस्थितीत वाटप झालेल्या गाई आहेत की विकल्या गेल्यात हे तपासणी गरजेचे आहे. हजारो कोटी रुपये गरिबांच्या नावाने शासन खर्च करत असते. तोच पैसा धनदांडग्यांच्या घरात जात असेल तर खपवून घेतले जाणार नाही. कोणत्याही विभागातील भ्रष्टाचार खपवून घेणार नाही. जिल्हा परिषदेत रस्त्यांची कामे न करताच देयके अदा करण्यात आली. याप्रकरणी उच्च न्यायालयात दाद मागितली. त्यानंतर न्यायालयाने चौकशीचे आद-ेश दिले होते. चौकशीतून काय निष्पन्न झाले हे कळायला मार्ग नाही. संपूर्ण प्रकरण गुलदस्त्यात आहे. आता जिल्हा परिषदेवर प्रशासकराज असल्याने सत्य जनतेसमोर यायला पाहिजे. जिल्ह्यात भ्रष्टाचार करणारे कोण आहेत हे जनतेला सांगण्याची गरज नाही. त्यांनी भ्रष्टाचार करण्यात पीएचडी केली आहे. ज्या योजना आहेत त्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी मग कोणाशीही दोन हात करावे लागतील तरी चालेल.

### जागतिक रंगभूमी दिन उत्साहात साजरा

अभिषेक राजपूत, तुषार ठाकरे, गिरीश वसावे, जितेंद्र पेंढारकर, आशिष खैरनार, जितेंद्र खवळे, रणवीर पेंढारकर, धर्मेंद्र भारती, विन-ोद चौधरी, रवींद्र कुलकर्णी, सुनील चौधरी, कल्पेश जाधव, कुणाल वसईकर, अरुण सोनार, केतन तांबोळी, वैभव गवळे, ऋषिकेश मंडलिक, पार्थ जाधव, नरेंद्र पाटील, योगेंद्र पाटील आदी उप-स्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर भावसार, नाट्यकर्मी नागसेन पेंढारकर, विजय पाटील, अभिषेक राजपूत, धर्मेंद्र भारती यांनी विविध कवितांचे व गाण्यांचे सादरीकरण केले. यावेळी नागसेन पेंढारकर यांनी दर महिन्याला विविध कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला.

### एकतिस मार्च पर्यंत शास्तीमाफी योजना

नागरिकांनी थकबाकी भरून सहकार्य करावे असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.महापालिकेच्यावतीने थकबाकीदारांसाठी शास्ती माफी योजना राबविण्यात येत आहे. पुर्वलक्षी प्रभावानुसारर या आधी थकबाकीसह व चालु आर्थिक वर्षातील मालमत्ताकराचा शास्तीसह भरणा करण्यात आलेल्या मालमत्ताधारकांना याचा परतावा अथवा समायोजनाचा लाभ मिळणार नाही. दि.२९ मार्च ते ३१ मार्च पर्यंत सुटी असली तरी देखील कार्यालय सुरू राहणार आहे.

# समाज कल्याण कार्यालयात दोन एप्रिलला लोकशाही दिन

**धुळे, दि.२८- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात १०० दिवस कृति आराखड्याची अंमलबजावणी सुरु आहे. त्यानुसार ७ कलमी उपक्रमातंर्गत जनतेचे प्रश्न, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी बुधवार २ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सुंदरसिंग वसावे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

राज्य शासनाच्यावतीने १०० दिवस कृती आराखड्यानुसार सात कलमी उपक्रमातंर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. शासनाच्या सर्वच विभागांनी यात सहभाग नोंदविलेला असून समाज कल्याण विभागामार्फत देखील विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार जनतेचे प्रश्न, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बुधवार २ एप्रिल रोजी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सिंचन भवनाच्या मागे, साक्री रोड, धुळे येथे सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी आपल्या अडअडचणी सोडविण्यासाठी या लोकशाही दिनास उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक आयुक्त श्री. वसावे यांनी केले आहे.

# विविध पक्षीय कार्यकर्त्यांनी केला शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**शहादा, दि.२८ (का.प्र.)- शहर व तालुक्यातील सरपंच,ग्राम पंचायत सदस्य,विविध पक्ष व सक्रीय संघटनेचे पदाधिकारींसह शंभर कार्यकर्त्यांनी आ.चंद्रकांत रघुवंशी यांच्या उपस्थितीत जिल्हा शिवसेना कार्यालयात शिवसेनेत (शिंदे गट)प्रवेश केला आहे.**

शहादा येथील शिवसैनिक मनलेश जायसवाल यांच्या प्रयतकाने मलोनी येथील समता युवा मंचचे अध्यक्ष व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे शहादा तालुका अध्यक्ष राजरतक बिरारे यांच्या नेतृत्वात शहादा शहर व तालुक्यातील मलोनी, ब्राम्हणपुरी, मलगांव, दुधखेडा, रायखेड, जुने बोधीपूर, धांद्रे, फेस, कोंढावळ या विविध गावातील सरपंच,ग्राम पंचायत सदस्य,विविध पक्ष व सक्रीय संघटनेचे पदाधिकारीं सह राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा सचिव शुभम कुवर, धांद्रे येथील सरपंच भिका मालचे, ग्रा.प.सदस्य रविंद्र वाघ, ग्रा.प.सदस्य राजु वाघ, गटनेते प्रकाश सोनवणे, विजयकुमार गायकवाड, कृष्णा नागराळे, रोहित धोंडरे, निलेश पावरा, राहुल पिंपळे, जितु जाधव सुमारे शंभर कार्यकर्त्यांचा शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व शिवसेना (पान ३ वर)



# गुढीपाडवा निमित्त भव्य शोभायात्रा नागरिकांना सहभागाचे आवाहन

**धुळे, दि. २८- विश्व हिंदू परिषद आयोजित हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती धुळे च्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र प्रतिपदा गुढीपाडवा रविवार दि.३० मार्च २०२५ रोजी सकाळी आठ वाजता ग्रामदैवत श्री एकविरा देवी मातेच्या मंदिरापासून भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांचे बारावे वंशज ह.भ.प. योगेश महाराज गोसावी पालखी वाले पैठण व आनंदजीवन स्वामीजी प्रमुख कोठारी महंत स्वामीनारायण मंदिर धुळे हे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती आयोजन समितीने पत्रकार परिषदेत दिली.**

एका हॉटेलमध्ये घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेप्रसंगी आ.अनुप अग्रवाल, शिवसेनेचे हिलाल माळी, कॉंग्रेस कमिटीचे युवराज करनकाळ, राष्ट्रवादीचे कैलास चौधरी, योगीराज मराठे, उमेश चौधरी, भरत देवळे, निफाडकर गुरुजी, विजय पाच्छापूरकर, हिरामण गवळी, प्रदीप कर्पे, मुन्ना अग्रवाल, सुभाष कांकरिया, नाना महाराज हालोर, लोकेश चौधरी, सचिन मराठे, मयूर सूर्यवंशी, महेंद्र विसपुते, राकेश संचेती, अमोल जाधव व समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### बबनबाई जाधव यांचे निधन; आज अंत्ययात्रा



शिरपूर, दि.२८- शहरातील रहिवासी बबनबाई भगवानसिंग जाधव (वय ८४) यांचे आज दि.२८ रोजी दुपारी साडेतीन वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.२९ रोजी शनिवारी सकाळी साडेदहा वाजता राहते घर, राजपूत वाडा, शिरपूर येथून निघेल. अमरधाम येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे. बबनबाई ऊर्फ इंद्रकुंवर जाधव या शिरपूर भा.ज.पा. च्या पहिल्या महिला अध्यक्षा होत्या. शिरपूर वरवाडे नगरपरिषद संचलित पांडू बापू माळी मुनिसिपल हायस्कूलचे अधीक्षक जितेंद्र भगवानसिंग जाधव यांच्या त्या आई होत्या. तसेच ओंकारसिंग सरदारसिंग जाधव यांच्या वहिनी, प्रेमसिंग जाधव यांच्या काकू होत.

## पान १ वरुन

### पादचारी जागीच ठार

ओढून नेल्याने दिपक पुकळे हा गंभीर जखमी होवून त्याचा मृत्यू झाला. अपघात होताच ट्रकचालक पळून गेला. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनला ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चोवीस तासाच्या आत ठोकल्या बेड्या

राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि.जिवन बोरसे, पोउनि.शरद लेंडे, हरिश्चंद्र पाटील, पोहेकॉ.सुनिल पाथरवट, अविनाश वाघ, विनोद पाठक, पोकॉ.शोएब बेग, अतिक शेख, सचिन पाटील, देवेंद्र तायडे, कुसबा गावित यांनी केली.

### पिंपळनेरमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन

ऐक्याचे दर्शन घडवले.या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत हिंदू-मुस्लिम ऐक्याची गरज आणि त्याचे महत्त्व यावर भाष्य केले. धर्म हा जोडण्यासाठी असतो, तोडण्यासाठी नाही, असे सांगत डॉ.प्रशांत बागुल यांनी सर्वांना सलोखा आणि प्रेम यांचे महत्त्व पटवून दिले.भरत बागुल यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, पिंपळनेर हे ऐक्याचे प्रतीक आहे. येथे सर्वधर्मीय लोक प्रेमाने आणि एकोप्याने राहतात. इफ्तार पार्टीचे आयोजन म्हणजे फक्त धार्मिक सोहळा नसून सामाजिक बंध मजबूत करण्याचा एक प्रयत्न आहे. असे उपक्रम सातत्याने होणे गरजेचे आहे, जेणेकरून समाजात प्रेम आणि बंधुत्व कायम राहील. या इफ्तार पार्टीत सुमारे २०० हून अधिक नागरिक सहभागी झाले होते. खजूर, फळे, फराळाचे पदार्थ आणि शीतपेयांचा यामध्ये समावेश होता. उपस्थित नागरिकांनी या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि पुढेही असेच उपक्रम सातत्याने व्हावेत, अशी इच्छा व्यक्त केली.

### सोनगीरजवळ गांजाची अवैध वाहतुक

सेकंड स्टेज, कावेरी नगर घर क्र.५६५ बंगळुर राज्य कर्नाटक व विजय अनिल पवास (वय ३४ )हे दोन्हीही मानवी मेंदुवर विपरित परिणाम करणारा गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगातांना आढळून आले. या दोघांविरोधात औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**हॉटेल भाडेतत्वावर देणे आहे**
धुळे-सुरत बायपास वरील जिल्हा रुग्णालयाजवळील राजेंद्र वालचंद शिंदे (पहेलवान) यांची हॉटेल भंडारा परमीट रुम बिअर बार असलेली हॉटेल भाडेतत्वावर देणे आहे
-: संपर्क :-
राजेंद्र वालचंद शिंदे (पहेलवान)
9421155555

**भाड्याने देणे आहे**
शहरातील मध्यवर्ती भागातील दुकान, ऑफिस, कुरियर, होलसेल औषधी विक्रेता इ.साठी भाड्याने देणे आहे
8329588369

**भाड्याने देणे**
ऑफिस, क्लिनिक, बँकेसाठी प्रशस्त १००० फूट हॉल फर्निचरसह भाड्याने देणे
पत्ता- बांबू गल्ली, गरुड कॉम्प्लेक्स
8408958987

**बंगला विकणे आहे**
वाडीभोकर रोड, स्टेडियम समोर, राम नगर पाण्याच्या टाकी जवळ, पूर्ण फर्निचर, कम्पौंड केलेला बंगला विकणे आहे
9423191694

**पाहिजे**
MI, Inter सर्व्हिस सेंटरमध्ये मुलगा लावणे आहे
कार्तिक हाऊस
देवपूर, धुळे
9422289612

**विकणे आहेत**
१) बलेनो डिझेल (२०१९)
२) वेन्टो डिझेल (२०१४)
३) I-10 मिऑन (२०२२)
-: संपर्क :-
9765866999

**- पाहिजेत -**
● नर्स/स्टाफ
● RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**मोफत प्रवेश**
सावली वृद्धाश्रमात मोफत प्रवेश! बेवारस, अंध, अपंग, मनोरुग्ण प्रवेश! आजी-आजोबा यांची सेवा करण्यासाठी २ जागा
-: संपर्क :-
आप्पा खताळ
सावली वृद्धाश्रम, मोहाडी,धुळे
9209789661

**भाड्याने देणे आहे**
बिअरबार व किचन चालविण्यास देणे आहे.
-: संपर्क :-
९९२३०४४४५२

**अर्जंट पाहिजे**
दिवस/रात्र पाळीसाठी हॉस्पीटल कामासाठी वॉर्डबॉय, मावशी पाहिजे
-: संपर्क :-
9175726344

**प्लॉट विकणे आहे**
तिरुपतीनगर, गव्ह. पॉलिटेक्निक जवळ, हायवे लगत, प्लॉट नं.५५, सर्व्हे नं.१०६/१, एरिया १६१४ स्क्वे.फूट प्लॉट विकणे आहे
-: संपर्क :-
9860745458

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड
भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानामध्ये कामासाठी महिला/मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौन्टंट
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) हेल्पर/मदतनिस माल वाटपसाठी
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975

**पाहिजेत**
होलसेल रेडीमेड ड्रेस कापड दुकानावर कामासाठी सेल्समन/हेल्पर तरूण मुले पाहिजेत.
वयोगट १८ ते ३५ वर्ष
8999243620
8275223627

**प्लॉट विकणे आहे**
देवपूर सर्व्हे नं.55/1 अ प्लॉट नं.10 CTS No.7293 विकणे आहे
-: संपर्क :-
9404499862

**ऑफिस भाड्याने देणे**
गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**बंगला विकणे**
वाखारकर नगर
अग्रवाल नगर
डोंगरे महाराज नगर
वल्लभ नगर
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**हॉल भाड्याने देणे**
डॉक्टर, हॉस्पीटल, बँका, ऑफिस, पतपेढीसाठी हॉल भाड्याने देणे आहे
१) दत्तमंदिर चौकात पहिल्या मजल्यावरील २५०० चौरस फूट.
२) स्टेशनरोड तळ मजल्यावर ५ कॅबिन, फर्निचर, वॉशरुमसह १८०० चौरस फुटाचा हॉल.
३) मालेगावरोड वरील तळ मजल्यावर २००० चौरस फुटाचा हॉल.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**दत्तमंदिर चौकात प्लॉट विकणे**
देवपूर दत्त मंदिर चौक परिसरात ३०००, ५००० आणि ६५०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉटस् विकणे**
एस.व्ही.के.एम. शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉटस् विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
अनुभवी ड्रायव्हर/अकौन्टंट/सेल्समन/हेल्पर पाहिजेत.
समक्ष भेटा!
MIDC, Dhule
8879442989

**पाहिजेत**
दुकान कामासाठी हेल्पर व अकाऊन्टंट पाहिजे.
पगार १०,०००/१२,०००
श्री स्वामी समर्थ ग्लास हाऊस
देवपूर, धुळे
8329837739

**पाहिजेत**
पेट्रोल पंपासाठी अनुभवी व होतकरु मेहनती मुले पाहिजेत
श्री स्वामी समर्थ पेट्रोल पंप
परिमल कॉलनी, पंचायत समितीपुढे, सिस्टेल स्कूलजवळ, धुळे
9322931357

**कुलिंग इंडिया की पहचान**
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०